# Rajiv Tambe

rajcopper@gmail.com / www.rajivtambe.com
Cell +91 9322399859

.................................................................................

## Innovative Always

Rajiv Tambe is a multi-award winning writer, poet, playwright and journalist. He has been consistently working for children, writing for them, teaching them using innovative methods, coaching and training teachers, meeting and counseling parents.

His methods are unique and innovative, all resulting out of his rich and varied experience, rather than bookish and pedantic theories.

His contact and appeal is almost immediate as his audience naturally connect with him sensing the sincerity of purpose.

Those who get a chance to play the number games and language games; all devised by Rajiv, are seized by the innovative fun and experience some of the unforgettable joyous moments of their lives.

……………………………………………………………………………….

# 01. लेखन कौशल्य कार्यशाळा.

कालावधी : 03 तास.
सहभागी मुलांचा वयोगट : इयत्ता 5वी ते 8वी
सहभाग : 40 मुले.
आवश्यक साहित्य : सर्व सहभागींनी वही पेन आणावे.

- या कार्यशाळेत मुलांनी काय लिहावे हे अजिबात सांगितले जात नाही.
- कसे लिहावे याबाबत मुलांशी गप्पा.
- लेखन तंत्र आणि लेखन पध्दती यांची ओळख.
- मुलांना लेखनाची सक्ती केली जात नाही.
- न लिहिणाऱ्या मुलांचा ही आत्मसन्मान राखला जातो.
- मुले वैयक्तिक आणि गटात भाषेचे विविध खेळ खेळतात.
- भाषेचे खेळ खेळताना ‘शब्द आणि संकल्पना, शब्द आणि दृश्यप्रतिमा’ यांचा सहसंबंध शोधताना आणि आपल्या भाषेतून त्या मांडताना नकळत विविध शैलींचा उपयोग करतात.
- ‘मी माझ्या मनातील विचार, माझ्या भाषेत आणि माझ्या पध्दतीने लिहू शकतो’ हा अनुभव मुले घेतात.
- मुलांच्या शालेय लेखनात व अभिव्यक्तीत विलक्षण फरक पडतो.

....................

# 02. यशस्वी होऊया.

कालावधी : 2 तास

अपेक्षित वयोगट : इयत्ता 9वी ते 12वी / वयवर्ष 15 ते 51.

- “आपण कधीच हरत नाही तर प्रत्येकवेळी नवीन गोष्ट शिकतो. जो नवीन गोष्ट शिकतो तो पुन्हा लढतो आणि जो लढतो तोच जिंकतो.” यशस्वी होण्यासाठीचे हे सूत्र प्रशिणार्थींच्या मनात रुजते.
- ‘विचार बदलले तरच कृती बदलते’ हे प्रशिक्षणार्थी अनुभवतात.
- अभ्यासाचे वेळापत्रक नव्हे तर ‘अभ्यासपत्रक’ कसे तयार करावे.
- ताण न घेता अभ्यास करण्याच्या पध्दती.
- परीक्षेत हमखास यश मिळण्याचे सूत्र.
- आपले लक्ष्य निश्चित करुन त्याकडे जाण्याचा आपला कृती आराखडा तयार करणे.
- आपणंच आपल्याला प्रेरित करत निराशेपासून लांब कसं राहावं?
- इतरांशी नव्हे तर स्वतःशी स्पर्धा करताना सकारात्मक दृष्टीकोन कसा वापरावा?
- मग मुलांशी थेट चर्चा व प्रश्नोत्तरे.

..........................................................................

# 03 विज्ञान : सप्रयोग गप्पागप्पी

प्रयोग करताना, विज्ञान गप्पा मारताना चुका करत आणि चुकातून शिकत विज्ञान समजून घेण्याचा अभिनव कार्यक्रम.

कालावधी : दोन तास.
अपेक्षित वयोगट : 7 ते 77
आवश्यक साहित्य : जुनी वर्तमानपत्रे.

- दैनंदिन जीवन आणि विज्ञान यांचा सहसंबंध जोडणारा सप्रयोग संवाद.
- घरातल्या आणि परिसरातल्या विज्ञानाबाबत सप्रयोग संवाद.
- सर्व सहभागी विज्ञानाचे तीन प्रयोग करुन संकल्पना समजून घेतात.
- पाऊस काळया ढगातून पडतो की पांढऱ्या?
- तेल तापलं आहे का, हे पाहण्यासाठी मोहरीच का घालतात?
- खाऊ ठेवायच्या बाटल्या गोलच का असतात?
- दुपारी सूर्य डोक्यावरच आला नाही तर त्यावेळी किती वाजतात?
- चषम्यांचे तीन प्रकार आणि त्यांच्या पुसण्याच्या पध्दती?
- सिलींग फॅन आणि टेबल फॅन एकाच दिशेने फिरतात का?
- घरातच शून्य खर्चाचा मायक्रोस्कोप कसा करता येईल?
- कागदाच्या सात घड्या का घालता येत नाहीत?
- जॅम आणि बामच्या बाटलीत नेमका फरक काय आहे?

.........................................................................

## 03. पालकांसाठी कार्यशाळा :

### 1. मुलांचा अभ्यास आणि पालक

कालावधी : 2 तास.

- मुलांच्या अभ्यासाबाबत पालकांची नेमकी भूमिका काय असावी?
- मुलांच्या अभ्यास करण्याच्या विविध पध्दती व त्याचे समायोजन. अभ्यसाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन कोणता?
- अभ्यास करताना येणाऱ्या ताणतणावाचं नियंत्रण कसं करावं?
- अभ्यासाचं वेळापत्रक कसं तयार करावं?
- मुलांच्या अभ्यासाची गती वाढण्यासाठी पालकांनी कुठल्या 5 गोष्टी करणं आवश्यक आहे?

.........................................

## 2. बालवडीतील मुलांचा अभ्यास, खेळ आणि पालक.

कालावधी : 2 तास.

- मुलांची वाचनपूर्व तयारी कशी करुन घ्यावी.
- मुलांची गणनपूर्व तयारी कशी करुन घ्यावी.
- मुलांना गोष्ट सांगण्याच्या वेगवगेळया पाच पध्दती.
- मुलांसोबत घरातच खेळता येणारे 'शून्य खर्चाचे' 25 खेळ.
- विविश संकल्पना स्पष्ट करणारे खेळ.
- विज्ञानाची ओळख आणि विज्ञानाचे सोपे 25 प्रयोग.
- ज्ञानेंद्रियांची ओळख, अनुभव आणि अनुभुती होण्यासाठी विविध खेळ.
- नाच पाहणे, करणे आणि अनुभवणे.
- मुलांच्या व्यक्तित्वविकासाठी पालकांना गृहपाठ.
- पालकांसोबत संवाद आणि प्रश्नोत्तरे.

..................................................

## 3. 10 वी चा अभ्यास आणि पालक

कालावधी : 2 तास
अपेक्षित सहभाग : 10 वी ची मुले आणि पालक.

- मुलांमधे सकारात्मक वृत्ती व सकारात्मक दृष्टीकोन रुजवणे गरजेचे असते.
- त्याचप्रमाणे मुलांनी इतरांशी नाही तर स्वतःशी स्पर्धा कशी करायची, अभ्यासातील टार्गेट फिक्स करुन त्याचा पाठपुरावा कसा करायचा व यासाठी आपल्यातल्या सूप्त शक्तीला पॉझीटीव्ह वळण कसे द्यायचे हे मुलांना शिकवावेच लागते.
- आपण आपल्या पालकांना कसे समजून घ्यायचे हे ही मुलांना समजवावे लागते.
- परीक्षेच्या आधीचे आणि परीक्षेच्या 3 तासांचे नियोजन कसे करावे याचे तंत्र आणि मंत्र.
- मुलांची अभ्यासाची गती वाढावी यासाठी पालकांनी नेमके काय करावे याचे सुयोग्य आणि नेमके मार्गदर्शन.
- घरातील ताणतणावांना फक्त पालक किंवा फक्त मुलेच काही जबाबदार नसतात कारण घरातील अशांतता हा एकत्रित परीणाम असतो.
- मुलांच्या मानसिक, भावनिक व लैंगिक भावविश्वाची दखल घेत घरातील ताणतणाव कसे सौम्य करावेत हे पालकांनाही शिकावे लागते.

...............................................

## 4. मुलांसोबत शिकण्याच्या नवनवीन पध्दती.

कालावधी : 2 तास.

- आपण मुलांना शिकवायचं नाही तर मुलांसोबत शिकायचं आहे.
- मुलांना शिकण्यासाठी उत्सुक करायचं आहे.
- किंबहुना 'तू काहीही शिकू शकतोस' हा विश्वास त्याच्या मनात आपल्या कृतीतून रुजवायचा आहे.
- यासाठी 'सुजाण पालकत्व' समजून घेतलं पाहिजे.
- पालकांच्या मुलांकडून अपेक्षा व सुसंगत वर्तन.
- पालक आणि मुले यांच्या नातेसंबंधातील ताणतणाव.
- मूल समजून घेण्याच्या विविध पध्दती.
- मुलांशी बोलण्याची भाषा व मुलांची भाषा.
- पालकांनी शाळेला पूरक भूमिका का आणि कशी घ्यावी?
- याबाबत सलग बोलल्यानंतर पालकांशी थेट संवाद व चर्चा.

..........................................................................

# बालवाडी शिक्षिकांसाठी कार्यशाळा

कालावधी : सहा तास.
प्रशिक्षणार्थी : 25 ते 35.
आवश्यक साहित्य : बालवाडीत वापरली जाणारी खेळणी.

- मुलांसोबत खेळायचे भाषेचे, गणिताचे आणि विज्ञानाचे खेळ. त्याचप्रमाणे इतर अनेक कल्पक खेळ. किंबहुना नवनवीन खेळ कसे तयार करावेत याचे ही मार्गदर्शन. शिक्षीका किमान 39 खेळ खेळतात आणि 29 नवीन खेळ तयार करतात. खेळामागील शास्त्र समजून घेतात.
- प्रत्यक्ष बालवाडीतच उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक साधनांचा वापर विविध प्रकारे अनेक विषय / घटक शिकविण्यासाठी कसा करावा याचे सप्रयोग मार्गदर्शन.
- मुलांच्या मानसिक व भावनिक गरजा लक्षात घेऊन नवनवीन गोष्टी कशा तयार कराव्या हे शिक्षिकेला समजणे गरजेचे असते.
- यासाठी कथालेखनाचा प्रत्यक्ष अनुभव कार्यशाळेत मिळतो.
- शिक्षिका नवीन 4 गोष्टी लिहितात व त्यांचे प्रभावी सादरीकरण करतात.
- चित्रवाचन आणि चित्रवाचनाच्या विविध पध्दती समजून घेताना शिक्षिका, मुलांचे प्रश्न विचारण्याचे कौशल्य विकसित करण्याच्या पध्दती, मुलांसोबत गप्पा मारण्याचे तंत्र आणि मुलांसोबत शिकण्याच्या पध्दती पण शिकून घेतात.
- बालवाडीतील मुलांचे मानसिक व भावनिक प्रश्न, त्यांच्या शिकण्यातील अडचणी आणि शिक्षिकेच्या अध्ययन / अध्यापनातील समस्या याबाबत समुपदेशन व मुक्त संवाद.

..........................................................................................

## प्राथमिक शिक्षकांसाठी : अध्यापन कौशल्य कार्यशाळा

कालावधी : सहा तास.
प्रशिक्षणार्थी : 40 शिक्षक
भाषा : मराठी. इंग्रजी. हिंदी.

- शिक्षकांना शिकविताना येणाऱ्या नेमक्या अडचणी व त्यावर सहज सोपे उपाय.
- मुलांचे अक्षर वळणदार होण्यासाठी व लेखनाची गोडी निर्माण होण्यासाठी खेळ.
- निबंध लेखनाच्या विविध 9 पध्दती.
- मुलांना '3003' असे लिहायल सांगितल्यास काही मुले '30003' असे लिहितात, तर काही मुलांचा '36 व 63' असे अंक लिहिताना गोंधळ होतो. या समस्या दूर करण्यासाठी सोपे खेळ.
- अर्धा, पाव व पाउण य संकल्पना समजणे आणि त्याचा व्यवहारात उपयोग करणे हे काही मुलांना जड जाते. या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी व मूल्यांकनासाठी 'या संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव देणारे' सोपे खेळ.
- कुठल्याही वर्गात करता येणारे आणि अभ्यासक्रमाला पूरक असे विज्ञानाचे (शून्य खर्चाचे) सोपे 29 प्रयोग.
- गणित आणि भाषेचे (शून्य खर्चाचे) अभ्यासक्रमाल पूरक व गरजाभिमूख असे सोपे 29 खेळ. (हे खेळ संकल्पना स्पष्ट करण्यासाठी, उजळणीसाठी आणि मूल्यांकनासाठी आहेत.)
- सकारात्मक दृष्टीकोन आणि वर्गनियंत्रण.
- प्रत्येक शैक्षणिक समस्येवर उपाय हा असतोच, याचा अनुभव शिक्षकांना प्रशिक्षण कलावधीतच मिळतो.

........................................................................